# <u>पोळं</u>

लेखिका: भक्ती जोशी

तिने पुन्हा एकदा त्या खाली ठेवलेल्या वाटणीच्या सामानाकडे पाहिले आणि चरफडत निघून गेली. कुणालाही उलटून बोलायचं नाही ,अशी सक्त ताकीद आईने दिली असल्यामुळे ती काहीही बोलली नाही. पण मनात खवळलेला संतापाचा डोंब मात्र शांत होत नव्हता. येतील तशा शिव्या तोंडातल्या तोंडात पुटपुटत ती बाहेर निघून गेली. त्या कामात सराईत असणारया एका पठ्ठ्याने चिडून तीला थांबवायचा निष्फळ प्रयत्न केला. पण ती त्याच्या हाताला हिसका देऊन तडतड निघाली.

“जाव दे. रामी येल, हो ते बाहेर बाजावर ठेव, पोर ना समझ हाये. जुनाच डाव...” म्होरक्याने समजावलं. एकाने सर्व उचलून बाहेर एका खाटेवर ठेवल. हे असच व्हायच. तिचा बाप गेल्यापासून या म्होरक्यानेच तिला त्यांच्या गटात सामिल करून घेतल होत. आपल्या मुलांसारख तिलाही जीव लावून शिकवत होता. पण तिचा तरी काय दोष होता, वयच उड़ाण होतं.

डोंगराच्या कुशीत दडलेला, गर्द झाडी, घनदाट जंगलांनी वेढलेला एक लहानसा जंगली पाडा, सामबाव. बाव म्हणजे विहीर, इथे शंकराची विहीर होती, अशी काहीशी आख्यायिका इथल्या लोकांमध्ये प्रसिद्ध होती. जेमतेम २०-२५ घरांचा पाडा ,त्यामुळे सर्व एकमेकांना ओळखत होते. शहराची हवा फारशी अजुन तरी इथे पोहोचली नव्हती. शेती करून पिकवलेले धान्य, फळ, औषधी, जंगलातुन काढून आणलेली मध हे सर्व पाड्यापासून जवळपास तीन तास पायपीट करून लांब शहरात विकणे , इतकाच काय तो शहराशी संबंध होता. आजुबाजुच्या जंगलांमध्ये कितीतरी हिंस्त्र पशु होते. अनेकदा ती जनावरे पाड्यावर येत असत. कोंबडया, बकरया उचलून नेत. मध्यंतरी कुणाची तान्ही बाळं ही नेल्याने आता इथली लोक फार काळजी घेत होती. गावचा म्होरक्या नवशा, आठवडयातुन- पंधरवड्यातुन एकदा, काही लोकांसोबत जंगलात जाऊन मध काढून आणत असे. प्रत्येकाच्या कामानुसार त्याच्या वाटण्या व्हायच्या. मधीच्या झाडानुसार त्या मधीचा भाव ठरवून ती विकायला नेली जात असे. पहाटेच मध काढायला जाणे आणि मग लगेच ती सकाळी बाजारात नेणे, फार मेहनतीच काम होत. एका दिवसात हे काम करावे लागे, नाहीतर आठवडाभर बाकी कामं पुरायची.

नवशा, तिचा बाप, त्याच्या गटासोबत असाच पहाटे अंधारात जंगलात गेला होता. उन्हाळ्यामुळे लवकर उजाडत असे. दिवस येण्याआधीच काम आटपायला हवे म्हणून आज एरव्हीपेक्षा लवकर निघाले होते. चार दिवसापूर्वी एका मोठ्या झाडावर तीन मधाची पोळी नवशाने हेरून ठेवली होती. सोबतच्या चार माणसांना तो सुचना देत चालत होता. आता काटेरी बावखल ओलांडल की, समोर ते झाड होत. बावखलात

काटे खुप होते ते चुकवत चालाव लागायचं. इतक्यात नवशाच्या पायाला काहीतरी टोचलं. अनुभवी त्याला जनावराचा दंश लक्षात आला. पण जंगलाचा प्रत्येक भाग माहित असल्याने ,या भागात विषारी साप येत नाहीत फारतर धामण नाहीतर तस्कर असेल, याची त्याला खात्री होती. अंधारात डोळे फाडून बघितल तरी काही दिसत नव्हत. सर्वजण झाडाजवळ पोहोचले, दोघांनी फुल, हळद-कुंकू वाहून देवारा केला. दोघा-तिघांनी झाडाखाली जाळ करायला पाला गोळा करायला सुरुवात केली. त्या उजेडात नवशाने पायावरच्या खुणा पाहिल्या, आज त्याचा अंदाज पूर्णपणे चुकला होता. नागाचा दंश त्याने ओळखला होता. अंगाची जळजळ पुढे काय होणार हे सांगत होती. पोरांनी जाळ आता बराच पेटवला होता. तीन पोळी भरगच्च भरलेली होती. त्यानुसार जाळ जास्तच लागणार होता. त्याच्या धुराने पोळ्याच्या माश्या आधीच घोंगावू लागल्या होत्या. त्यांच्या झुंडी वेगाने बाहेर उडू लागल्या. जास्त मधमाश्या असल्याने काही वेळ सोबत आणलेल्या कांबळी सर्वांनी ओढून घेतल्या. नवशाला नागाच्या दंशाची जाणीव आता कासावीस करत होती. बाजुच्या झाडाला टेकून कांबळ ओढून बसलेल्या रागबाला तो खोल जाणारया आवाजात अखेरच
सांगत होता,

“रागबा, माझ्या वाडघिनला न बायोला नांगशील ना? माझा काय बेस नाय वाटं.”

“असा क्याला बोलं? काय इधेल होवा काय?” रागबा न कळून विचारता झाला.

पण पुढच काहीच उत्तर आल नाही. मध काढायला झाडावर चढायला दोन तरणी मुले धावली आनि झाडचा बुंधा पकडून सरसर चढू लागली. रागबाने नवशाचे कांबळ काढले. तोंडातून आलेल्या फेसामुळे काय घडले आहे, ते त्याला कळले होते.

नवशाने जाताना मागितलेले मागणे पूर्ण करण्यासाठी तो रामीचा मोठ्या बहिणीप्रमाणे आणि चार वर्षांच्या बायोचा सांभाळ करत होता. बायोचा बाप इथला म्होरक्या होता, म्हणून बायोला मान ही मोठा होता. एक दिवस काम करताना बायोच्या वागण्यातला अरेरावीपणा रागबाने पाहिला आणि आपले अतिलाड पोरीचं आयुष्य वाया घालवतील, या भीतीने त्याने बायोला बाकी लोकांप्रमाणे कष्ट करायला लावायचे ठरवलं. तिला काम शिकवताना रागबा कधीच दयामाया दाखवत नसे. तिला तिच्या कामाच्या मोबदल्याइतकीच वाटणी मिळत होती. याच गोष्टीचा बायोला राग येत असे. तिला सर्वांत कमी वाटा मिळत असल्याने ती, आता तो वाटाही न घेण्याचं ठरवून रागाने निघून जात असे. रागबा रामीला भावाच्या मायेने काही कमी पडू देत नव्हता. दहा वर्ष भरकन उडून गेली. पाहता पाहता बायो तेरा –चौदाची झाली. गेल्या तीनेक वर्षात बरीच कामं शिकली, पण रागबा अजूनही तिला झाडावर चढून पोळं कापायला देत नसे. मुद्दाम साधी कामं देऊन वाटणीही कमी देत असे. आजही ती याच कारणासाठी प्रचंड चिडली होती. तणतणत ती हात पाय आपटत घरी गेली. रामीला

आता याची सवय झालीच होती. काहीही न बोलता ती तिच्या वाटणीच्या मधीचा भाव ठरवायला रागबाकड़े गेली. रागबा तिचीच वाट पहात होता,

“आजच्याला जास्त नाय मिलेलं आहं. ओढाच मिलेल... तरी मंगा नेउ बाजाराला ,बड्डा.”

खरतर मधं विकून काही सामान आणण्याची तिला गरज होती पण रागबाचे म्हणणं तिला पटत होतं. मध त्याच्याकडे ठेवून फक्त भाजी घेवून ती घरी आली. काहीही न बोलता तीच काम करत राहिली. ते पाहून बायोने स्वत:च विषय काढला,

“होते तरी क्याला आणेलं? “ तिला मोठी कामं मुद्दाम देत नसल्याचा आरोप ती वारंवार करत होती आणि रामी तिला समजावत होती की, ही वस्ती आहे म्हणून त्यांच संरक्षण होतय. उगीच भांडण करून त्यांच्यापासून दूर व्हायला नको. रामीच्या नेहमीच्या वाक्याने या बोलण्याचा शेवट झाला,

“रानांत कलपात जनावरं राहतात, तवाचं मोठी शिकार करतात...नायतं सोता शिकार होतात...तुला कललं कधीतरं”

आठ दिवसांनी सकाळी रागबा बायोला हाक मारीत रामीच्या झोपडीबाहेर आला. रामीने तिला बाहेर जाऊन पहायला सांगीतल, काय काम असणार हे बायोला माहिती होतं, पण तिचा राग अजूनही गेला नव्हता. शेवटी रामीने घरात धुसफुस सुरु केली तशी कोपरयातली काठी घेवून ती पाय आपटत बाहेर येवून रागबाच्या मागे चालु लागली. मध शोधण्यासाठी रागबा तिला नेहमी घेवून जाई. चालतांना तो तिला सारख्या सुचना देत होता, ती फ़क्त हुंकारत होती. रानात पोळी शोधायला जाताना तो नेहमी तिला सोबत घेवून जात असे, पण पोळी कशी शोधायची, ते मात्र त्याने अजुन तिला शिकवलं नव्हतं. रानात पोहोचल्यावर एका मोहाच्या झाडाजवळ थांबुन त्याने तिला वर पहायला खूण केली. वर चांगली दिड हात लांबीची दोन मोठाली पोळी दिसत होती. उद्या सकाळी गावचा बाजार, म्हणजे आज मध्यरात्रीनंतर ही पोळी काढायला हवी होती. त्यानुसार आज बाकी लोकांना वर्दी देऊन तयारी करायला सांगायच काम त्याने बायोवर सोपवलं. या असल्या हलक्या कामाचा तिला वीट आला होता. पण बोलायची सोयं नव्हती.

घरी आल्यावर सर्वांना निरोप देऊन येऊन ती झोपडीच्या खांबाला टेकून बसली होती. रामीला तिची चाहुल लागताच ती पाणी घेऊन बाहेर आली. बायोच्या हातात पाणी देत ती ही तिथेच बसली.

“ आय, बाबा असता त मला मोठा हिस्सा मिलला असता काय? “

रामीने तिच्या बोलण्यावर हसून उत्तर दयायचं टाळल. विषय जास्त वाढायला नको म्हणून ती पुन्हा कामाला आत निघून गेली. तिची प्रतिक्रिया बायोला अजुनच टोचत होती. त्याच तिरमिरित ती उठली आणि घराबाहेर मचाणावर चढली. काहीतरी शिजत

होतं तिच्या डोक्यात. दुपारभर ती कसल्यातरी कामात गुंतली होती, काय हे मात्र कळत नव्ह्त. संध्याकाळ झाली तशी आयेला थोड़ी मदत करताना ती म्हणाली,

“ आये, आजच्याला रातीला मी बाहेर मचाणावर निजनं.”

“क्याला?”

“जाम गर्मी लागं आत निजाया.”

ती ऐकणार नाही ,हे रामीला माहिती होतं. रात्री पाड्यावर दिवे मालवू लागले, तसे बायोने आपला बिस्तर उचलून मचाणावर नेवून ठेवला. संपूर्ण पाड्यावर आता सामसूम झाली होती. सर्व घरांमधले दिवे मालले होते. चंद्र डोक्यावर आला तशी बायो भूत्या घेऊन खाली उतरली. घरामागच्या लाकडं ठेवायच्या पडवीत एका मडक्यात ठेवलेले सामान अलगत बाहेर काढले. मचाणाखाली आणून तिने मडक्यातला कडूनिंबाचा पाला उपसला, त्यातुन दुपारी धार लावलेला कोयता बाहेर काढला, त्या चंद्रप्रकाशात कोयत्याची पाजवलेली धार चकाकली. मचाणावरची घोंगडी आणि मडक्यात सामान घेऊन ती झपाझप रानाच्या दिशेने निघाली.

रागबासोबत तिने काल हा रस्तापाहुन ठेवला होता. चंद्राचा प्रकाश चांगला पसरला होता. लहानपणापासून रानात फिरलेल्या तिला आता भीती नावाची गोष्टच उरली नव्हती. सकाळी पाड्यावरचे रानात येण्याच्या आत तिला काम उरकायच होत. थोड्याच वेळात ती त्या झाडाजवळ पोहोचली. वर मोठाली ती दोन पोळी लोंबलेली दिसली. तिने भरभर मडक्यातले सामान बाहेर काढून ठेवले. हळदकुंकु वाहुन नमस्कार केला. सोबत आणलेल्या कडूनिंबाचा जाळ पेटवला आणि तो एका पोळ्याच्या फांदीखाली ठेवला. जसा धुर वर पोहोचला तशा माश्या घोंगावू लागल्या. घोंगडी ओढून ती शांत पडून राहिली. माश्या उडून गेल्यावर परत फिरून येतात असे ती ऐकून होती, म्हणुनच तिने घोंगडी बाजुला करून मडक्याची दोर पाठीवर अडकवली आणि परकराचा काष्टा टाकुन झाडावर चढायला सुरुवात केली. आज पहिल्यांदाच ती मध काढायला चढत होती. मडक गुडुक गुडुक कमरेच्या दोन्ही बाजुला हलत होतं. ते फुटू न देता चढणं कसब होतं. नेमक्या फांदीजवळ पोहोचली आणि तिच्या लक्षात आलं, तिने केलेला जाळ कमी झाला होता, त्यामुळे अर्ध्यापेक्षा जास्त माशा अजूनही पोळ्यावर बसून आहेत आणि त्याही चवताळलेल्या असणार हे तिने ओळखलं. दुसरया पोळ्याच्या माश्यातर हलल्या ही नव्हत्या. इतक्यात फिरून परतलेल्या माश्यांपैकी काही माश्या तिच्याभोवती घोंगावत आल्या आणि तिच्या चेहरयाला- हाताला दंश करू लागल्या. बायो कळवळली, ओठ दातात घट्ट आवळत तिने मडक्यात ठेवलेला कोयता काढला. फांदीवर आडवं झोपून तीने हात लांबवत कोयत्याने सुरुवातीचा रिकामा भाग काढून टाकला आणि मधाने भरलेलं रसाळ पोळ कापायला सुरुवात केली. पाठीला चावणारया माशा आता तिला सहन होत नव्हत्या. त्यांना हाकलण्यासाठी हात मागे नेताना अर्ध्यापेक्षा जास्त पोळ कापलं गेलं आणि खाली पडलं. आपल्या डोळ्यादेखत जमिनीवर

पडून फुटलेलं पोळ पाहून तिचा संताप होतं होता. दुसरया पोळ्याकड़े पहायला आता तिला सवड नव्हती. ती भरभर खाली उतरू लागली. थोडसं तरी मध मिळावं, या हेतूने ती ते तुकडे गोळा करायला धावली. थोड्याच वेळात पाड्यावरचे लोक येतील, हे तिला ठावुक होते. तिने वेग वाढवला, त्यातल्यात्यात मोठे असणारे चार पाच तुकडे तिने मडक्यात टाकले. अमृत मिळवल्याचा आनंद तिच्या चेहरयावरुन वाहत होता. उभं राहून तिने मडकं पाठीला लावलं. आता पाड्यावर जाऊन रागबाला आपले कर्तुत्व दाखवावे आणि आजपर्यंत आपले पाय ओढ़ल्याचा जाब विचारावा, याच विचारात ती स्वतःवर खुश होत मागे वळली. मघाशी झाडाच्या बुंध्याला मारलेला कोयता हातात घेतला आणि वाट चालु लागली. पण क्षणभरच... कसल्याशा चाहुलीने ती दचकली.

भरकन मागे वळली, समोर धाप लागल्यासारखी जीभ लोंबत असणारा, थोड्याश्या हालचालीचाही वेध घेणारे तीक्ष्ण कान टवकारून, झेप घेण्याच्या पावित्र्यातला एक लांडगा तिच्यावर नजर रोखून उभा होता. दोन पायांवर तोल सावरत , हातातला कोयता समोर उभा धरत ती त्याचा हल्ला चुकवायला थोड़ी वाकली. तो ही दबकत एक एक पाऊल पुढे येत होता आणि अचानक त्याने तिच्याकडे धाव घेतली. तिने कोयता हवेत फिरवत बाजुला उडी घेतली. पहिला हल्ला चुकवला गेला होता. तो पुन्हा तयारीत होता. ती ही सावध झाली. झाडावर चढ़ावे का या विचारात ती असतानाच त्याने हल्ला केला. तिने परत कोयता फिरवला पण आता हाताची थरथर होत होती. अंगाला घाम सुटला होता, कोयता मुठीतुन सुटून लांडग्याच्या दिशेने भिरकावत गेला. आता पळण्याशिवाय दूसरा उपाय नव्हता. लांडगा पुन्हा वळण्याच्या आत , बायो सुसाट धावू लागली. तिच्यामागे लांडगा ही धावत होता. त्याने लवकरच तिला गाठले आणि पोटरीचा लचका धरला. ती पुन्हा कळवळली. कमरेची दोरी सैल करत तिने मडके त्याच्या डोक्यात जोरात आपटले. तो लचका तोडत लांब गेला. डोक्यात जाणारया वेदना तिला आता सारं संपलं, याची जाणीव करून देत होत्या. तिने मागे वळून पाहिलं, तो कुठेच दिसत नव्हता. बायोने उभं राहायचा प्रयत्न केला. एका हातात मडकं सांभाळत, लंगडत ती शेजारी असणारया मोठ्या दगडावर चढली. खाली बसून तिने पायाच्या जखमेचा अंदाज घेतला. मांस लोंबकळत होते, आतले हाड पाहून तिला गरगरू लागले. मडक्यावर डोकं ठेवून ती मोठे श्वास घेऊ लागली. इतक्यात मनात आलेल्या त्या एका विचाराने ती दचकली. लांडगे कधीच एकटे राहत नाहीत. आता लवकरच या एका लांडग्याचे साथीदार येणार हे तिने ओळखले होते...आणि पुन्हा ती चाहुल लागली. आता ती अजुनच सावध झाली. पाय लांब केलेल्या दिशेने एक लांडगा त्याचे पुढचे दोन पाय दगडावर ठेवून उभा होता. तिने चटकन तिचा पाय जवळ ओढला. त्याने सोबत अजुन चार लांडगे आणले होते जे त्याच्या मागे उभे होते. घाबरून तिने जोरात किंचाळत मदतीच्या अपेक्षेने पाड्याच्या वाटेकडे पाहिले. एका लांडग्याने तिच्या दगडाभोवती दोन चार फेरया मारल्या. वर चढण्यासाठी तो मार्ग

शोधत होता. तिच्या पायातून दगडावर वहाणारया रक्ताचे ओघळ त्याने हुंगुन पाहिले. बायोच्या घशाला कोरड पडली होती. बाकीचे लांडगे चारही बाजूने उभे राहिले. एकाने थोडं लांब जाऊन धावत येउन वर चढण्याचा प्रयत्न केला. तो आता खरचं वर येणार या भीतीने बायो मागे सरकली आणि मागच्या बाजुने मागे घसरली. मागे उभ्या असणारया त्या लांडग्याने तिच्या परकरचे टोक पकडले. कसेतरी स्वतःला सावरत तिने एका हाताने त्याला झटका दिला तसे ते जीर्ण कापड फाटले. लांडग्याला चढण्यात अपयश आलेले पाहून ती पुन्हा त्या गोलाकार दगडाच्या मध्यभागी बसली. लांडग्यांना घालवण्यासाठी आता तिच्याजवळ काहीच हत्यार नव्हतं. त्याच्या पुन्हा एक उडी मारण्याच्या प्रयत्नात तिने हातातलं मडकं त्याच्या दिशेने फेकलं. त्याने मात्र शिताफीने तो मार चुकवला. खुप जास्त रक्त गेल्याने बायोला आता डोळ्यापुढे अंधारी येत होती. खुप वेळ तिने स्वतःला सांभाळले होतं. आता मात्र ती हरत चालल्याचे तिला कळत होतं. आपल्या हातात आता काहीही राहिले नसल्याची आणि मनातून आधीच हरल्याची जाणीव तिला पोखरुन काढू लागली. लांडग्याच्या लचक्याने पायाला झालेली जखम सहन होत नव्हती , जर त्यांच्या तावडीत सापडलो तर जीव जाईपर्यंत प्रत्येक लचक्याचा दाह कसा सहन होणार, या घाणेरडया विचाराने तिला धडधडू लागले. लांडगे आता चारही बाजूने उड्या मारून तिला खाली पाडण्याचा प्रयत्न करत होते आणि ती असहाय दगडाच्या मध्यभागी बसली होती. शरीराचा तोल सांभाळणे आता  अशक्य होत होतं. दुरवर कुठेतरी तिला अंधुकशी हालचाल जाणवली.

“बाssss योssss “ रागबाचा आवाज तिने त्या अवस्थेत ही ओळखला. पण प्रत्युत्तर देण्याचीही ताकद आता तिच्यात उरली नव्हती.

श्वास मंद होत असल्याचे तिला जाणवत होते. पापण्या जड होऊन मिटत चालल्या होत्या. काही अंतरावर आवाज येऊ लागला, पण काय बोलत होते ते? तिला भान राहिले नव्हते. शेवटचे कसलेसे मोठाले आवाज तिने ऐकले आणि शांत झाली.

जाग आली तेव्हा आपण दगडावर नाहीत, हे तिला जाणवले. बाजूला रामीला पाहून तिला आपण घरी आल्याचे समजले. पाय हलवायचा तिने थोडा प्रयत्न केला , तशी एक सणक डोक्यात गेली.

“निजुन राय. मंगा बोलू. “ रागबाने तिचा हात हातात घेत म्हटलं.

त्याच्या आवाजातला जडपणा तिला त्या अवस्थेतही कळत होता. बायोच्या डोळ्यात अश्रु आले. ते पुसत तो पुन्हा बोलता झाला’

“तुझ्या बाला शबुद हाय माझा, तुझ्या बायोला काय नाय होऊ द्याचा.” असे म्हणत त्याने स्वतःचे डोळे पुसले. त्यावरून बायोला तिथे काय घडले याचा अंदाज आला. तिला आता स्वतःची लाज वाटत होती. आतल्याआत गहिवर दाटत होता. डोळ्यांत नक्की पाणी साचले आहे की पुन्हा अंधारी येतेय, हे तिला कळत नव्हते. पण पापण्या पुन्हा जड झाल्या होत्या आणि कानात रामीचे शब्द घुमत होते,

"‘रानात कलपात जनावरं राहतात, तवाचं मोठी शिकार करतात...नायतं सोता शिकार होतात...तुला कललं कधीतरं’"...

समाप्त